# मेट्रो ३ : सहार रोड भुयाराचेही काम पूर्ण

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मार्गाचे काम वेगाने सुरू असून, बुधवारी पॅकेज ६ मधील आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ ते सहार रोडदरम्यानचे भुयार खणण्यात बुधवारी एमएमआरसीएलला यश आले. तब्बल १६० दिवसांत तापी १ या टीबीएम मशीनने भुयार खणण्यात आले असून, तानसा या जलवाहिनीला सुरक्षित ठेवून हे भुयार खणण्यात आले.

मेट्रो ३ च्या पॅकेज ६ मधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ ते सहार रोडदरम्यानच्या ६९२ मीटरचे भुयार खणण्यात आले आहे. १५० निष्णात अभियंते आणि कामगारांची मेहनत यामुळे हे यश मिळाल्याचे सांगण्यात आले आहे. तापी



१ हे टीबीएम मशीन १३ सप्टेंबर रोजी विमानतळापासून कार्यान्वित झाले. मुंबईतील सर्वात जुनी आणि तितकीच महत्त्वाची जलवाहिनी तानसाला न हलवता त्या खालून सहार मेट्रो स्थानकांच्या बांधणीचे काम करण्यात आले आहे. सर्वात जुन्या वाहिनीच्या खालून काम करण्याचे आव्हानात्मक काम लिलया पार पाडण्यात अभियंत्यांना यश मिळाल्याची भावना मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी व्यक्त केली आहे.

- तापी १ टीबीएम ८९ मीटर लांब
- प्रतिदिन ४.३१ मीटर इतक्या वेगाने भुयारीकरण
- ब्रेशिया आणि बेसाल्ट खडकांना भेदण्याचे काम
- ४९५ आरसीसी सिमेंट रिंग्जचा वापर
- ५२ किमी भुयारीकरणापैकी २० किमीहून अधिक भुयारीकरण पूर्ण
- १७ टीबीएम मशीन १० लॉंचिंग शाफ्टमधून कार्यरत